

"Education for Knowledge, Science, and Culture"
- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# Vivekanand College, Kolhapur
## (Empowered Autonomous)

KOLHAPUR (AUTONOMOUS)

# News

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Empowered Autonomous)

विद्यार्थी उपस्थित होते।

पुण्य नगरी

बुधवार, १६ जानेवारी २०१९

# विवेकानंद महाविद्यालयात भूगोल दिन उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विवेकानंद महाविद्यालयात भूगोल विभागाच्या वतीने आयोजित भूगोल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागातील प्राध्यापक, भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संभाजी शिंदे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. रोपास पाणी घालून कार्यक्रमास प्रारंभ झाला. प्रास्ताविक व स्वागत भूगोल विभागप्रमुख प्रा. एच. पी. पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. शुभांगी काळे यांनी करून दिला. आभार प्रा. जी. एस. उबाळे यांनी मानले. सूत्रसंचालन वैभव खोत यांनी केले. यावेळी प्रा. एस. डी. जोशी, प्रा. डॉ. राज चव्हाण, प्रा. विकास मस्के, प्रा. हरताळे यांच्यासह प्रशासकीय सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । सोमवार, ९ डिसेंबर २०१९

# एच. पी. पाटील यांना पुरस्कार



कोल्हापूर : क्रांतिसूर्य फाउंडेशनच्यावतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार विवेकानंद कॉलेजचे भूगोल विभागप्रमुख प्रा. एच. पी. पाटील यांना प्रा. बाबूराव कदम यांच्याहस्ते देण्यात आला.

प्रा. पाटील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्यरत असून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयात रक्तदान शिबिर, एड्स जनजागृती, लेक वाचवा आदी विषयांवर जनजागृती, वृक्षारोपण यांसारख्या उपक्रमांचे आयोजन करतात. महापुरावेळी न्यू पॅलेस परिसरातील ३०० पूरग्रस्तांना सुरक्षितस्थळी आणण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. शाहूवाडीतील दुर्गम भागातील लोकांसाठी मोफत औषधोपचार शिबिराचे आयोजन केले. ॲनिमिया मुक्तीसाठी पाच गावे दत्तक घेऊन त्यांनी भरीव मदत दिली होती.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी पाटील यांचे अभिनंदन केले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Empowered Autonomous)

तरुण भारत बुधवार, १६ जानेवारी २०१९

# विवेकानंद कॉलेजमध्ये भूगोल दिन उत्साहात

कोल्हापूर : माणूस आणि निसर्ग यांच्यातील संघर्ष न थांबल्यास पर्यावरणीय समस्या निर्माण होतील, असा इशारा शिवाजी विद्यापीठातील भूगोल अभ्यास मंडळाचे डॉ. संभाजी शिंदे यांनी दिला. स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये भूगोल दिनी आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य एस. वाय. होनगेकर होते.

प्राचार्य होनगेकर म्हणाले, पर्यावरणाच्या रक्षणासाठी युवा पिढीने पुढाकार घ्यावा. पर्यावरणपूरक संशोधन करावे, शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व्हावा, असे स्पष्ट केले. भूगोल विभाग प्रमुख प्रा. एच. पी. पाटील यांनी स्वागत केले. डॉ. शुभांगी काळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. जी. एस. उबाळे यांनी आभार मानले. यावेळी वैभव खोत, प्रा. एस. डी. जोशी, डॉ. राज चव्हाण, प्रा. विकास मस्के, प्रा. हरताळे, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

सकाळ कोल्हापूर कोल्हापूर, गुरुवार, १४ जानेवारी २०२१

# शहराशेजारच्या गावांत वाढते नागरीकरण

## विकासासाठी हद्दवाढ गरजेचीच; प्रा. सुनील भोसले यांच्या अहवालातील निष्कर्ष

[illegible]



[illegible]

... नोंद जनगणना नगर (सेन्सेक्स टाउन) म्हणून झाली आहे. शहरातील लोकसंख्येची घनता दिवसेदिवस वाढत असून, शहरवाढीचा कल हा दक्षिणेकडील जनगणना नगराकडे असल्याने त्यांची संख्या वाढून शहर नैसर्गिकरीत्या दक्षिण व पूर्व दिशेला वाढत आहे. त्यामुळे या गावांचा विचार हद्दवाढीत व्हावा, असे अहवालात म्हटले आहे.

### नागरी संक्रमण पट्ट्यातील गावे

शहराच्या नागरी पट्ट्याने जोडणाऱ्या गावात शिंगणापूर, बालिंगे, पाडळी खुर्द, वाडीपीर, वाशी, कळंबा, पाचगाव, गिरगाव, कंदलगाव, गोकुळ शिरगाव, उजळाईवाडी, मोरेवाडी, तामगाव, मुडशिंगी, सरनोबतवाडी, उचगाव, गांधीनगर, वळिवडे, शिरोली, टोप या २० गावांचा समावेश होतो. पूर्व आणि दक्षिण दिशेची गावे हद्दवाढीच्या दृष्टीने अभ्यासकाला अधिक अनुकूल वाटतात. या गावांच्या हद्दी आणि शहराची हद्द एकमेकांत मिसळली आहे.

### अहवालातील नमूद गोष्टी अशा :

- पालिकेची महापालिका झाल्यापासून शहराची लोकसंख्या तीन लाखांनी वाढली
- क्षेत्रफळात एका इंचानेही वाढ नाही
- १९९१ पासून दक्षिण आणि पूर्व दिशेच्या गावात लोकसंख्या वाढीचा वेग अधिक
- या गावातील लोकसंख्याही मोठ्या प्रमाणात वाढत गेली
- कृषीवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींची संख्या कमी होत आहे
- शेतीसाठी जमिनीचा वापरही कमी होत गेला आहे



महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । गुरुवार, १७ जानेवारी २०१९

# विवेकानंद कॉलेजमध्ये भूगोल दिन

कोल्हापूर टाइम्स टीम

'भावी पिढीच्या कल्याणासाठी हव्यासू वृत्तीचे आत्मपरिक्षण करण्याची वेळ आली आहे. निसर्गसंपत्तीचा योग्य वापर केला तरच भविष्यात आपल्याला श्वास घेता येणार आहे' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील भूगोल अभ्यासमंडळाचे अध्यक्ष डॉ. संभाजी शिंदे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आलेल्या भूगोल दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

डॉ. शिंदे म्हणाले, 'मानव व निसर्ग यांच्यात टोकाचा संघर्ष सुरु आहे.'

यावेळी भित्तीपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. प्रा. एच. पी. पाटील यांनी स्वागत केले. डॉ. शुभांगी काळे यांनी डॉ. शिंदे यांचा परिचय दिला. वैभव खोत यांनी निवेदन केले. MT

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Empowered Autonomous)

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । शुक्रवार, १४ सप्टेंबर २०१८

## भूगोल मंडळाचे उदघाटन

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये भूगोल विभागाच्यावतीने भूगोल मंडळाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे भूगोल विभागप्रमुख डॉ. एस. एस. पन्हाळकर यांच्याहस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. यावेळी डॉ. पन्हाळांकर म्हणाले की, निसर्ग, समाज आणि मानवाच्या सभोवताली असलेल्या समस्या ओळखून त्या सोडवण्यासाठी भौगोलिक ज्ञान आवश्यक आहे. भूगोल या विषयात अनेक कौशल्यपूर्ण शिक्षणाची संधी आहे. प्रा. एच. पी. पाटील यांनी प्रास्ताविक केले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous)
ESTD
JUNE
1964

सकाळ बुधवार, १६ जानेवारी २०१९

# 'विवेकानंद'मध्ये भूगोल दिन

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात भूगोल दिन साजरा झाला. शिवाजी विद्यापीठाचे भूगोल विभागातील प्रा. डॉ. संभाजी शिंदे म्हणाले, ''निसर्ग साधनसंपत्तीचा काटकसरीने वापर केला पाहिजे.'' प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर अध्यक्षस्थानी होते. विविध विषयांवरील भित्तीपत्रिकेचे प्रकाशन झाले. भूगोल विभागप्रमुख प्रा. एच. पी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शुभांगी काळे यांनी परिचय करुन दिला. प्रा. जी. एस. उबाळे यांनी आभार मानले. वैभव खोतने सूत्रसंचालन केले. प्रा. एस. डी. जोशी, प्रा. डॉ. राज चव्हाण आदी उपस्थित होते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Empowered Autonomous)

सकाळ
शनिवार, १० डिसेंबर २०२२
४

# शाहू कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव यशस्वी

कोल्हापूर, ता. ९ : राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव झाला. शिवाजी विद्यापीठामार्फत घेतलेल्या स्पर्धेत ७० महाविद्यालयांमधील पदवी स्तरावरील १८९ विद्यार्थी संशोधक सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी स्पर्धेसाठी संशोधन लेख, पोस्टर, पी.पी.टी., मॉडेल्स सादर केले. विद्यापीठाने संशोधन प्रकारानुसार १८ परीक्षक नेमले होते. स्पर्धेनंतर पारितोषिक वितरण झाले. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम अध्यक्षपदी तर विज्ञान व तंत्रज्ञान विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एच. ठकार, डॉ. एस. बी. साघळे, रयत शिक्षण संस्थेच्या दक्षिण विभागप्रमुख मोहिते उपस्थित होते.

स्पर्धेत सहा इव्हेंट होते. त्यात ह्युमॅनिटीज, लँग्वेज आणि फाईन आर्टस्‌मधून विवेकानंद महाविद्यालयाची श्रेया मांडेकर (प्रथम), शोभा वाघमोडे (द्वितीय), राजाराम कॉलेजची दिव्या जगदाळे (तृतीय), मेडिसिन आणि फार्मसीमधून आनंदी फार्मसी कॉलेज, कळंबेतील सौजन्या कदम (प्रथम), शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागातील जान्हवी नाईक (द्वितीय), श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरूडची आकांक्षा काळे (तृतीय), विवेकानंद कॉलेजची अंकिता वरुटे (तृतीय), कॉमर्स, मॅनेजमेंट आणि लॉमधून डीआरके कॉलेज ऑफ कॉमर्सची काव्या शिरगावी (प्रथम), श्री शिव-शाहू महाविद्यालय सरूडची वैष्णवी पाटील (द्वितीय), शाहू कॉलेजचा निशांत मटाले (तृतीय), प्युअर सायन्समधून दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स व कॉमर्स कॉलेज, इचलकरंजीतील सिरमन मुजावर(प्रथम), आनंदी फार्मसी कॉलेज, कळंबेतील जतीन सासने (द्वितीय), दि न्यू कॉलेजमधील विदुल जोशी (तृतीय), ॲग्रिकल्चर आणि अनिमल हजबंडरी विभागातून कमला कॉलेज येथील सीमीन बागवान (प्रथम), दि न्यू कॉलेज येथील मुनीफ अन्सारी (द्वितीय), दि न्यू कॉलेज येथील विजया जंगम (तृतीय), इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी विभागातून दि न्यू कॉलेज येथील ऋतुजा पाटील (प्रथम), यशवंतराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीची साक्षी पाटील (द्वितीय), वारणानगर तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग आणि टेक्नॉलॉजीची मानसी मुळीक (तृतीय) यांचा समावेश आहे.

विजेत्यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र दिले. आविष्कार संशोधन स्पर्धेचे समन्वयक प्रा. यू. एस. शेळके यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. पी. पवार यांनी पारितोषिकांचे वाचन केले. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षप्रमुख डॉ. शकील शेख यांनी आभार मानले. डॉ. महेश रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या सरोज पाटील, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डॉ. एम. बी. शेख आदींनी भेट दिली.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Empowered Autonomous)